Review Of Research
Vol. 3 | Issue.6 | March.2014
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# दलित साहित्य ः बदलते प्रवाह काही निरीक्षणे

**प्रा.डॉ.डी.आर.गायकवाड**
मराठी विभाग, दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् आणि सायन्स सोलापूर.

**प्रस्तावना ः**

मराठी साहित्याला प्रदीर्घकालीन, समृध्द, संपन्न व अखंड परंपरा आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी मराठी साहित्याचे दोन भागात विभाजन करता येणे शक्य आहे. अ) प्राचीन मराठी वाङ्मय किंवा मध्ययुगीन मराठी वाङ्मय ब) आधुनिक मराठी साहित्य असे होय. सामान्यतः ब्रिटीश राजवट पूर्वकाळात निर्माण झालेल्या साहित्याचा उल्लेख प्राचीन मराठी साहित्य असा केला जातो. तर सन **1818** नंतर निर्माण झालेल्या साहित्याचा समावेश आधुनिक मराठी साहित्यात केला जातो. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, मुस्लीम साहित्य, बाल साहित्य व विज्ञान साहित्य आदी आधुनिक मराठी साहित्यातील काही महत्वाचे प्रवाह होय. या साहित्य प्रवाहांचा समावेश आधुनिक मराठी साहित्यात केला जातो. वरील सर्व साहित्य प्रवाह विविध गुण वैशिष्ट्यांमुळे भिन्न ठरतात. प्रस्तुत शोधनिबंधात केवळ दलित साहित्य प्रवाहाचा विचार अपेक्षीत आहे. विशेषतः दलित साहित्य संकल्पना, उद्‌गम, विकास व स्वरूप-वैशिष्ट्ये इत्यादी घटकांच्या अनुषंगाने येथे काही निरीक्षणे अपेक्षीत आहेत. सदर अभ्यास वर्णनात्मक व तुलनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करून येथे करावयाचा आहे.

दलित साहित्याच्या बदलत्या प्रवाहाविषयी चर्चा करण्याअगोदर दलित साहित्याची मुळ संकल्पना काय? प्रेरणा कोणत्या आहेत? प्रयोजन कोणते याची उकल केल्याशिवाय दलित साहित्याच्या बदलत्या प्रवाहाची कल्पना येणार नाही. यासाठी दलित साहित्याच्या वैचारिक गाभ्यापर्यंत जाणे क्रमप्राप्त आहे.

दलित साहित्य ही आधुनिक मराठी साहित्यातील एक क्रांतिकारक अशी घटना आहे. क्रांतिकारक या अर्थाने की, मराठी साहित्यात आशय, अभिव्यक्ति, अनुभव, विचारधारांचा प्रभाव, बदलते समाजवास्तव या अनुषंगाने अनेक प्रवाह आले. त्या त्या काळात त्यावर चर्चा वादविवाद झाले. भूमिका मांडल्या गेल्या. पण त्यात सातत्य राहिले नाही. मात्र दलित साहित्य प्रवाहाला सहा दशकाचा काळ उलटून गेला तरीही ते अव्याहतपणे गतीमान समृध्द आहे. आजही त्या संदर्भात साधक बाधक चर्चा होताना दिसून येतात. विविधांगाने संशोधन होत आहे. दुसरे असे की, आधुनिक मराठी साहित्यात जे प्रवाह आले ते मराठी पुरतेच सिमित राहिले. इतर प्रांतातील किंव भाषेतील साहित्यावर त्याचा परिणाम झालेला नाही. परंतु दलित साहित्याच्या प्रभाव इतर प्रांतातील साहित्य प्रवाहावर झाला. थोडक्यात आज दलित साहित्याचा महत्वाचा प्रवाह हा भारतीय साहित्याचा प्रवाह झालेला आहे. इतकेच नाही तर जागतिक पातळीवर

देखील या प्रवाहाची नोंद घेतली जात आहे. गेल्या पन्नास वर्षातील दलित साहित्य प्रवाहातील हा लक्षणीय स्वरूपात्मक बदल होय. ही गोष्ट मराठी साहित्य व भाषेच्या दृष्टीने मला निश्चितच अभिमानाची आहे.

दलित साहित्य प्रवाह आज सहा दशकाहून अधिक वर्षे टिकून राहिल असा दिलासा देणा-या कलाकृतीची विविध विकसित रूपे साकार होतान दिसतात. दलित साहित्य प्रवाह टिकवून धरण्यासाठी अशी कोणती ऊर्जा नेमकी कारणीभूत ठरली ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची विचारधारा ही दलित साहित्याचा मुलभूत प्रेरणास्त्रोत आहे हे निर्विवाद होय. कान्तिकारी जीवननिष्ठेचे सामूहिक भान हे दलित साहित्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारामुळे लढ्यामुळे मिळाले. या कांतिकारी जीवननिष्ठेमुळे विषम समाज व्यवस्थेतील रूढी-परंपरा दास्य-दैन्य, अज्ञान अंधश्रध्दा यांच्या ओझ्याखाली बदलत्या मानवी मूल्यांचा शोध आणि ती मानवी मूल्ये रूजविण्याचा आग्रह दलित साहित्य धरते. जीवनाच्या सर्वच स्तरावर दलित वंचितौचे माणूसपण ज्या व्यवस्थेने हिरावून घेतले आहेत त्या व्यवस्थेविरूध्द लढणारी दलित साहित्यप्रवाहाची चळवळ ही सांस्कृतिक आघाडी होय. थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक पुनर्रचनेचा विचार हा दलित साहित्य चळवळीचा मुख्य गाभा होता. दलित साहित्य विचारातून विकसित झालेल्या मूलभूत कांतिकारी जाणिवा आणि समाजवास्तवाशी असलेले नाते यामुळेच दलित साहित्यात गतिमानता व प्रवाहीपणा आहे. दलितांच्या दैन्याला केवळ जातीव्यवस्था, आर्थिक विषमता कारणीभूत नसून आर्थिक, सामाजिक मूल्येही दलितांच्या विकासाच्या विरोधात आहेत. त्यामुळे दलित लेखक आपल्या लेखनातून प्रचलित समाजव्यवस्था व मुल्यव्यवस्था नाकारून स्वातंत्र्य, समता, बंधूता यावर आधरित समाजाची पुनर्रचनेचा विचार मांडतो. दलित साहित्यातील नकार व विद्रोह जातीव्यवस्था नाकारून न्याय समाज व्यवस्थेची पुनर्बांधणी करू इच्छितो. केवळ निर्मितीचा आनंद व लोकरंजनासाठी दलित लेखक लिहीत नाही तर समाज परिवर्तन दलित लेखकाला अपेक्षीत आहे. सहा दशकाच्या काळात दलित साहित्य प्रवाहात जे स्वरूपात्मक व गुणात्मक बदल झाले तरी आज दलित साहित्याचा प्रवाह हा गतिशिल आहे. कारण समाजवास्तव व हा प्रवाह समांतरपणे चालत राहिला आहे.

दलित साहित्याने साधारणतः ढोबळमानाने अभ्यासाच्या सोयीसाठी महत्वाचे तीन टप्पे संभवतात. त्यातील बदलाचा धावता आढावा पुढीलप्रमाणे ः

पहिला टप्पा बाबासाहेबांची चळवळ सुरू झाली तेव्हापासून ते **1960** पर्यंतचा मानता येईल़ दुसरा टप्पा **1960** ते **1980** पर्यंतचा तर तिसरा **1980** ते **2010** सालापर्यंतचा. ह्या निबंधात एवढया प्रदीर्घ काळाच तपशील आढावा घेणे शक्यच नाही. काही ठळक आणि महत्वाच्या घटनांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न पुढीलप्रमाणेः

**1960** पर्यंतचा काळ हा दलित साहित्यिकांचा चाचपण्याचा कालखंड होता. या अर्थाने की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीच्या अनुषंगाने कलाकार, गीतकार, कवी उदयाला आले. त्यांनी त्या काळात ज्या रचना केल्या, कलाकृती सादर केल्या त्या मुख्यत्वे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणात जो संदेश द्यायचे जे समाजकारण राजकारण करीत त्याल सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम या कलावंतांनी प्रामाणिकपणे केले. बाबासाहेबांच्या चळवळीच्या अगोदरही अस्पृश्यतेच्या अमानूष चालीरिती, रूढीपरंपरा विरूध्द लिखाण केले गेले आहे. साधारणतः **1950** च्या सुमारास बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या पिपल्स एज्युकेश्न सोसायटीच्या मिलींद व सिध्दार्थ कॉलेजमधून दलित तरूणांची सुशिक्षित पिढी बाहेर पडली. ही पिढी डॉ. आंबेडकरी चळवळीने भारावलेली आणि सामाजिक बांधिलकी असलेली होती. किंबहुना हाच त्यांचा लक्षणीय विशेष होता. समाजासाठी काहीतरी करावे, काहतिरी लिहावे ही त्यांची प्रामाणिक भावना होती. पण कसे लिहावे काय लिहावे ह्या संभ्रमात त्यांनी जे काही थोडेफार लेखान केले होत ते तत्कालीन मध्यमवर्गीय वाङ्मयीन मूल्यांच्या वळणावर गेले. दलिताच्या त्या वेळच्या नियतकालिकातून आणि बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त प्रकाशित होणा-या विशेषांकातून ते प्रकाशित केले जात होते. **1956** साली बाबासाहेबांनी लाखो अनुयायासह नागपूर येथे स्विकारलेल्या बौध्द धर्माने दलित साहित्याला वेगळे परिणाम तर दिसेच पण सांस्कृतिक बदलाची नवी चाहूल जाणवत होती. यातूनच **1958** साली मुंबईत पहिले दलित साहित्य संमेलन भरविण्यात आले.

डॉ. आंबेडकरांच्या निधनानंतर संमेलनाचे अध्यक्षपद अण्णाभाऊ साठे यांनी भूषविले. याच संमेलनात आमच्या साहित्याला दलित साहित्य संबोधून त्याचा वेगळा विभाग असावा असा ठराव पारित करण्यात आला होता.

या काळात म्हणजे 1960 अगोदर अण्णा भाऊ साठे व शंकरराव खरातांसारखे लेखक दलित उपेक्षित वंचितांच्या भावना व्यक्त करणारे साहित्य लिहीत होते. मध्यमवर्गीय लेखकांकडूनही दलितांचे चरित्र चित्रण करणारे साहित्य लिहीले जात होत. पण दलित साहित्य ही संकल्पना 1960 च्या दशकातीलच. तरी देखील 1960 च्या अगोदरच्या लेखक-कविंनी आपल्या लिखाणात जी सामाजिकता जोपासली ते एका अर्थाने दलित साहित्य प्रवाहाचे बीजारोपणच होते.

1960 ते 1980 या दोन दशकात दलित साहित्याच्या भूमिकेवर चर्चा होत होत्या. दलित साहित्यिक विचारवंताकडून समर्थन केले जात होते. तर दलितेत्तर साहित्यिकांकडून वेगवेगळी मते व्यक्त होताना दिसत होती. दलित साहित्य नावाने वेगळे दालन उभे राहू शकत नाही असे प्रा. भालचंद्र नेमाडे म्हणत होते. ह्या लेखनात बुजरेपणा आहे असे प्रा. वा. ल. कुलकर्णी सांगत होते. दलित लेखकांनी परंपरा नाकारू नयेत त्या समृध्द कराव्यात असे वि. वा. शिरवाडकर यांचे मत होते. दलित कवी हे एकाच वार्डातील पेशंट आहेत अशी टिंगल टवाळी दिलीप पुरूषोत्तम चित्रे करीत होते. तरीही हा कालखंड दलित साहित्य चळवळीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा पायाभूत असा कालखंड होय. बाबुराव बागुलांचे कथासंग्रह नामदेव ढसाळांचा 'गोलपिठा' प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणीचे पक्षी' डॉ. गंगाधर पानतावणे यांचे 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे'. प्रा. केशव मेश्राम यांची 'हकीकत' व 'जटायु' दया पवारांचे 'बलुतं' व लक्ष्मण मानेचे 'उपरा' ही आत्मकथने. दलित साहित्य चळवळीतील पहिल्या पिढीतील महत्वाच्या कवींचे कवितासंग्रह याच काळात प्रकाशित झाले. कथासंग्रह प्रकाशित झाले. याच काळात दलित साहित्य की, बौध्द साहित्य, मार्क्सवाद की आंबेडकरवाद हे दलित साहित्यांर्गत वाद हिरिरीने लढले गेले. या काळातील सर्वात मोठी घटना म्हणजे 1972 साली झालेली दलित पँथरची स्थापना आणि त्या अनुषंगाने निर्माण झालेले दलित साहित्य होय. दलित रंगभूमीची संकल्पना देखील याच काळात आकारला आहे. दलित जीवनात वाटयाला आलेले दाहक अनुभव सामाजिक विषमतेविरूध्द बंड आमचे जीवन वेगळे आमचे साहित्य वेगळे असे अनेक पद असलेल्या साहित्यकृती निर्माण होत होत्या. कथा कविता मोठ्या प्रमाणात लिहिल्या जात होत्या. एकूणच या काळात दलित साहित्य प्रवाहाला चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले होते. दलित साहित्य चळवळ अधिक व्यापक व गतिमान झाली ती याच काळात होय.

वर उल्लेख केल्याप्रमाणे क्रांतिकारी सामूहिक भान या पिढीला होते. त्यातूनच दलित साहित्य प्रवाहाला जाणीवपुर्वक गती देण्यासाठी संस्थात्मक काम याच काळात झाले.

या काळात दलित साहित्याला वैचारिक अधिष्ठान मिळाले. मराठी साहित्याला एक सशक्त प्रवाह म्हणून त्याच्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले गेले. वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देणे ही दलित प्रवाहाची ऐतिहासिक गरज होती. कारण दलित साहित्याला नव्या जीवन – जाणिवा नवी मूल्ये रूजवायची होती. दलित साहित्य प्रवाहात पुढे अनेक लेखक कवी सामील झाले. काहींना सामील व्हावे लागले. त्या नव्या जाणिव आणि मुल्ये रूजविण्याची ज्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला त्यात डॉ. म. ना. वानखेडे, प्राचार्य म. भि. चिटणीस, बाबुराव बागूल, डॉ. गंगाधर पानतावणे, वामन होवाळ, शंकरराव खरात, वामन निंबाळकर, अर्जून डांगळे, डॉ. भाऊ लोखंडे यांची नावे घेता येतील. दलित साहित्याला गती देण्यासाठी अनेक नियतकालिके प्रकाशित करण्यात आली. पण डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या संपादनाखाली गेली चाळीस वर्षे अव्याहतपणे दलित साहित्याला बळ देणा-या "अस्मितादर्श" त्रैमासिकाचा गौरवाने उल्लेख करावा लागेल. अनेक दलित लेखक घडविण्याचे ऐतिहासिक कार्य 'अस्मितादर्श' ने केले आहे. दलित साहित्याचे अनेक देशी परदेशी भाषात अनुवाद वेगवेगळया भाषेतील नियतकालिकांचे विशेषांक दलित साहित्यातील अंतर्विरोधाची चर्चा अशा अनेक घटनांची यादी करता येईल. प्र. गं. भा. शरदार, प्रा. रा. भि. जोशी, प्रा. रा. ग. जाधव, डॉ. भालचंद्र फडके, शरद्चंद्र मुक्तिबोध, दि. के. बेडेकर, नरहर कुरूंदकर, प्रा. श्री. नेरूरकर, डॉ. सदा कहाडे यासारख्या पुरोगामी विचारधारेतील समीक्षक विचारवंतानी दलित साहित्याच्या मूलभूत

जाणिवा आणि प्रेरणा आपल्या लेखनातून विकसित केल्या . वरील विचारवंतांचे दलित साहिरूयाच्या समृध्दीतील योगदान महत्वाचे आहे .

साधारणतः **1980 85** ते आतापर्यंतच्या दलित साहित्य प्रवाहात अनेक लक्षणीय बदल झाले . सर्वात मोठा बदल म्हणजे दलित साहित्य प्रवाहाला असलेले चळवळीचे भान सुटायला लागले होते . दलित साहित्याची चळवळ ही सांस्कृतिक चळवळ असून परिवर्तनवादी संवेदनशीलतेशी जोडलेली आहे ही जाणीव धूसर व्हायला लागली होती . या काळात प्रामुख्याने तीन स्तरातील लेखक लिहू लागले होते . विद्यापीठातील कॉलेजातील प्राध्यापक वर्ग, सेवानिवृत्त बुध्दजीवी अधिका-यांचा वर्ग आणि शहरी ग्रामीण भागातील साहित्यिक कार्यकर्त्यांचा वर्ग होय . त्यामुळे दलित साहित्य हे **1980** च्या अगोदर जसे एका सूत्रात बांधलेले दिसत होते . एका ठळक प्रवाहाच्या रूपाने जाणवत होते त्यात अनेक छटा आणि संमिश्रता आली . काही कथा कादंब-या वगळता हा कालखंड प्रामुख्याने आत्मकथनाचा मानता येईल . 'उचल्या' 'आयदान' 'अक्करमाशी' व 'उपरा' ही काही महत्वाची आत्मकथने होत . या आत्मकथनामुळे दलित साहित्यात विविधता आली . वेगवेगळ्या उपेक्षीत वंचित घटकांची शब्दस्पंदने व्यक्त होऊ लगली . एका अर्थाने दलित साहित्य व्यापक निर्मितीच्या पायावर याच काळात उभी राहिले . कारण या अगोदर प्रामुख्याने बौध्द समाजतील लेखक कवी हे लिहीत होते . याच काळातील आणखी एक लक्षणीय विशेष म्हणजे वैचारिक साहित्याची अनेक अंगाने झालेली निर्मिती होय . आंबेडकरी चळवळीशी निगडीत असलेल्या लढ्यांचा इतिहास सांस्कृतिक पातळीवरच्या तमाशा, जलसा ह्या लोककला बाबासहेबांनी सामाजिक शैक्षणिक शेती, नियोजन, अर्थ, लोकशाही, राष्ट्रीय एकात्मता, स्त्रियांचे प्रश्न याविषयी मांडलेल्या विचारांची उकल करणारी पुस्तके आली . संशोधनाच्या पातळीवर देखील कार्य होऊ लागले . दलित साहित्य प्रवाहाला पूरक असेच हे कार्य होते .

दलित साहित्य विश्वात विविधता विपुलता आली . कविता मोठया प्रमाणावर लिहीली जात होती . या पिढीतील कविंना मागील पिढीतील कविता ही बटवटीत निवेदनात्मक व त्याच त्याच प्रतिमात गुंतलेले वाटत होती . विद्रोहात्मक व आवाहनात्मक भाव होता . तो शहरी ग्रामीण भागातील साहित्यिक कार्यकर्त्यांच्या कवितेत जाणवत होता . पण प्राध्यापकांच्या व सेवानिवृत्त बुध्दिजीवींच्या कवितेत तो सापडत नाही . हे कवी तंत्रात व आकृतीबंधात अडकत चालले होते . आत्मकथनाच्या बाबतीत जर एकसुत्रीपणा जाणवत असला तरी त्यातील अपरिहार्यता ही लक्षात घेणे आवश्यक आहे . कारण सर्वच आत्मकथन समान सामाजिक पातळीवर बेतलेली आहेत .

या काळात विद्यापीठीय पातळीवर व अन्य पातळीवर दलित साहित्याचा अभ्यासकमात झालेला समावेश . यामुळे दलित साहित्य प्रवाहात काही बदल झाला का . याचाही शोध घेणे आवश्यक आहे . शिवाजी, पुणे, मुंबई, नागपूर व डॉ . आंबेडकर विद्यापीठ औरंगाबाद इ . महत्वाच्या विद्यापीठात दलित साहित्याचा समावेश अभ्यासकमात झाला . या साहित्य प्रवाहावर रएज्य राष्ट्रीय चर्चासत्र भरवून विचारमंथन व संशोधन काम होऊ लागले . विद्यार्थ्यांच्यात एक आत्मियतेची भावना निर्माण झाली .

कांतिकारी जीवननिष्ठेशी बांधिलकी आणि परिवर्तनवादी संवेदनशीलशी नाते ही दलित साहित्याची दोन सुत्रे आजच्या दलित साहित्यात दिसत असली तरी त्याचा उच्चार जितक्या तीव्रपणे व्हायला हवी, जितक्या धीटपणे व्हायला हवा तितका होत नाही याची मीमांसा करताना अनेक तरूण साहित्यिक विचारवंत रिपब्लिकन चळवळीतील गटबाजीवर घसरताना दिसताना . गटबाजीचे किंवा फाटाफुटीचे मी समर्थन करीत नाही . फक्त एवढेच सांगू इच्छितो की ज्या **60** ते **80** च्या काळात दलित साहित्य बहाराला आले त्या काळात देखील गटबाजी आणि फाटाफूट होती . दलित साहित्य प्रवाहातील नावारूपाला आलेले लेखक हे चळवळीतील कार्यकर्ते होते हे देखील लक्षात घ्यायला हवे .

परिणामी आजच्या दलित साहित्यिकांच्या पिढीमध्ये एक प्रकारचे दुभंगलेपणा आले आहे . दुभंगलेपण या अर्थाने त्यांना एकाच वेळी दलित साहित्यिक म्हणवून घ्यायचे आहे आणि त्याचवेळी त्यांना मराठी साहित्य विश्वांकडून मान्यता हवी असते . यात गैर काहीच नाही . कारण मराठी साहित्याचाच दलित साहित्य एक सशक्त प्रवाह आहे . दुभंगलेपणा ह्या अर्थाने की अनेक साहित्यिक स्वतःला दलित साहित्यिक म्हणवून घ्यायला विचकतात . त्यांना वाटते की आपण

दलित साहित्यिक म्हणवून घेतले की बंदिस्त होऊन जाऊ. परंतु हा त्यांचा अहंगंड आहे असे मला वाटते आणि तो चळवळीसाठी मारक आहे.

दलित साहित्याची मूलभूत भूमिका विद्रोहीपणे मांडणारे बाबुराव बागूल केवळ मराठी कथा साहित्य विश्वाला नव्हे तर भारतीय पातळीवरच्या कथा साहित्याला नवा आयाम देताना दिसतात. दलित साहित्याची मूलभूत संकल्पना संकुचित कधीच नव्हती माणूस हा दलित साहित्याच केंद्रबिंदू आहे. सर्व प्रकारच्या शोषणातून मानवमुक्ती हा दलित साहित्य प्रवाहाचा ध्यास आहे. दलित साहित्य आपले नाते वैश्विक साहित्याशी जोडते. दलित ही जात नसून जाणीव आहे. दलित हा शब्द जातीवाचक नसून मूल्यवाचक आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे क्रांतिकारी जीवननिष्ठेचे सामूहिक भान हरपल्यामुळे या काळात दलित साहित्य प्रवाहात आलेला मोठा बदल म्हणजे व्यक्तिसापेक्ष मांडल्या जाऊ लागलेल्या साहित्यविषयक भूमिका होत. हा विचार मांडण्यामागे साहित्यविषयक भूमिका असेलही पण साहित्यबाह्य करणेदेखील नाकारता येत नाही. दलित साहित्यामुळे ज्यांना वैचारिक बळ मिळाले आणि त्यातून नावारूपाला आलेले डॉ. यशवंत मनोहर दलित साहित्य ही संकल्पना नाकारून त्याला आंबेडकरवादी साहित्य असे नाव देतात. दलित साहित्याच्या प्रेरणा आंबेडकरवादी नाहीत काय? अरूण काळे भुजंग मेश्राम यांची कविता या काळात कशी बहाराला आली. दलित रंगभूमीचे बोधी रंगभूमी असे नामांतर केले गेले. कथा कविता कादंबरी ह्या वाङमयप्रकारापेक्षा नाटक हा वाङमयप्रकार साकार करण्यास अनेक घटकांची आवश्यकता असते. प्रा. सिध्दार्थ तांबे हे दुस-या पिढीतील नाव पथनाट्य हा प्रकार तर जवळजवळ संपुष्टात आाल्यासारखा वाटतो. आंबेडकरी जलसाकारांनी गायकांनी चळवळीचा विचर जनसामान्यापर्यंत पोहोचविल तशी दलित रंगभूमी पोहचू शकली नाही. कार्यशाळेत आणि थिएटरमध्ये ती बंदीस्त न राहता ती जनसामान्यापर्यंत पोहचवायला हवी. रंगभूमी ही सामूहिक आविष्कार असतो. बांधिलकी मानणारी थोडेफार त्याग करणारी आणि चळवळीचे भान असणारी पूर्णवेळ टीम उभी राहिल्याशिवाय हे शक्य होत नाही असे वाटते.

खंर तर दलित साहित्य ही संकल्पना केवळ भारतीय साहित्य पातळीवर नव्हे तर जागतिक साहित्य पातळीवर मान्यता पावली आहे आणि रूढ झाली आहे. तरी देखील व्यक्तिसापेक्ष गटसापेक्ष पर्याय दलित साहित्याला दिले जातात. बौध्द साहित्य, आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य, परिवर्तन साहित्य, विद्रोही साहित्य, उठाव साहित्य, मूलनिवासी साहित्य मुळातच देशीवादाचे जनक प्रा. भालचंद्र नेमाडे दलित साहित्य ही संकल्पना नाकारतात. किंबहुना दलित साहित्य असे दालन साहित्यात उघडण्याची शक्यता नाही असे विधान साठीच्या दशकात ते करतात. असे असतान देशीवादाचे समर्थक दलित साहित्याशी नाते का जोडू पाहतात. देशी साहित्य निर्मिती झाली पाहिजे ह्या भूमिकेला विरोध असण्याचे कारण नाही. देशीवादाची व्याख्या करताना प्रा. नेमाडे म्हणतात देशीचा अर्थ त्या त्या भूमीशी जोडलेले असणे प्रायः होते. खरे तर प्रत्येक वस्तु देशीच असेल तर देशीपणाची चर्चा करण्याचे कारण काय. परंतु देशी नसलेल्या परक्या बाहेरून येणा-या अनेक मूल्यांचे भाषांचे संस्कृतीचे देशी मूल्यांवर भाषांवर व संस्कृतीवर जेव्हा आक्रमण होते तेव्हा स्वतःच्या अस्तित्वासाठी मानवी समूहाला देशी व्हावे लागते. देशीपणाच्या नावाखाली नेमकी कुठची देशी मूल्ये आणि संस्कृती त्यांना टिकवायची आहे. भारतीय राज्यघटनेने स्वीकारलेले एक माणूस एक मुल्य हे मुल्य देशी नाही. ते परकिय आहे. लोकशाही हे मूल्य देखील देशी नाही परदेशी आहे. इंग्रजीसारख्या परकीय भाषेचे प्राध्यापक असलेले नेमाडे ही मुल्ये नाकारणार का. दलित साहित्य प्रवाहाने स्विकारलेली जीवनमुल्य ही आधुनिक आणि परिवर्तनशील संवेदनेशी निगडीत आहेत. दलित साहित्य हे वैश्विक मानवतावादाशी नाते जोडू पाहते. विषमता जोपासणा-या अनेक देशी परंपरा मूल्य आणि रूढी दलित साहित्याने नाकारलेल्या आहेत. म्हणूनच दलित साहित्याला देशीवादाच्या चौकटीत बसविण्याचा प्रयत्न बरोबर नाही.

महानगरीय साहित्य प्रवाह मराठीत उभा राहू इच्छित आहे. या प्रवाहाला विरोध करण्यासाठी मार्क्सवादी, समाजवादी विचारधारेवर निष्ठा असलेले लेखक, समीक्षक देशीवादाचा आश्रय घेताना दिसतात त्यांनी देशीवादाची

वैचारिकता मुळातून तपासाची जागतिकीकरण विरूध्द देशीवाद अशा काळया पांढया रंगात तपासण्याची पारंपारिक चूक त्यांनी करू नये.

**60** तो **80** या काळात साहित्य निर्मितीच्या संदर्भात केवळ जीवनमुल्यांचाच विचार झाला असा नाही तर साहित्य मूल्यांचादेखील विचार केला गेला. समाजशास्त्रीय दृष्टीचा अभाव असलेली मराठी समीक्षा ही दलित साहित्याला उपयुक्त नव्हती. बाबुरावांच्या कथेने जे रेखाटले ते पारंपारिक मराठी समीक्षेच्या चौकटीत बसणारे नव्हते. भाषेतील बेरकी रांगडेपणा आणि हादरवून सोडणारे अनुभवविश्व संपूर्ण मराठी कथेला ओलांडून पुढे जाणारे आहे आणि म्हणूनच पारंपारिक कलामूल्यांच्या चौकटीत ती दिसू शकत नाही. दलित साहित्याला वेगळ्या समीक्षेची गरज का आहे याचे उत्तर इथे सापडले.

**1972** साली प्रकाशित झालेल्या 'गोलपिठा' या कवितासंग्रहाची समीक्षा करणे अनेक मान्यवर समीक्षकांना जमले नाही कारण त्यातील शब्द अनुभव हे मराठी साहित्याल नवीनच होते. यादृष्टीने महाराष्ट्र टाईम्स **11.11.1973** मध्ये डॉ. अर्जून डांगरे यांनी केलेली समीक्षा महत्वाची ठरते. दलित साहित्य समजून घेताना केवळ कलावादी समीक्षा सौंदर्य मूल्ये आवश्यक नाही तर नवीन शब्दकोशाची देखील गरज आहे. नवे नायक नवे आदर्श नव्या पुराणकथा दलित साहित्यात उभ्या राहिल्या पाहिजेत.

**1980** च्या काळात ह्या गोष्टींचा पाठपुरावा केलेला दिसत नाही. दलित साहित्यावरच्या भाषणाची किंवा लेखांची संपादित पुस्तके म्हणजे समीक्षा ग्रंथ होत नाही. सलगपणे आजपर्यतच्या साहित्य निर्मितीच्या संदर्भात समीक्षा ग्रंथ प्रकाशित होणे आवश्यक होते.

दलित साहित्य प्रवाहातील आणखी एक बदल म्हणजे आज अनेक स्त्रिया धीटपणे लिहू लागल्या आहेत. या काळातील काही आत्मकथने आणि कविता वाचल्या की हे लक्षात येते. हा बदल निश्चितच स्वागतार्ह आहे. पुरूषस्ताक संस्कृतीविरूध्द लिहीणे म्हणजे स्वैराचार असे मांडून त्यांचा आवाज दडपणे हे आंबेडकरवादात बसत नाही. दलित साहित्याच्या मुळ धारणेशी विसंगत आहे. दलित लेखिकांच्या लेखनाचे स्वागत केले पाहिजे.

दलित साहित्याचा पुढचा प्रवाह निश्चितच सशक्त आणि समर्थ राहणार आहे. याबद्दल मला शंका नाही. दलित साहित्य आवर्तात सापडले आहे अशी आवई उठविली जाते. अरूण काळे, भुजंग मेश्राम हे काळकथित झाले आहेत. पण लोकनाथ यशवंत, वाहरू सोनवणे, उर्मिला पवार, गौतमीपुत्र कांबळे, अरूण मिरजकर, कुमार अनिल, महेंद्र भवरे, जी. के. ऐनापुरे, संजय पवार, सिध्दार्थ तांबे, धम्मपाल रत्नाकर, प्रज्ञा पवार, अविनाश गायकवाड असे दमदार सर्जनशील चेहरे दलित साहित्य प्रवाहाला नक्कीच वेगळे परिमाण देतील यात शंका नाही.

दया पवार, लक्ष्मन माने यांना फोर्ड फाऊंडेशन मिळाल्यामुळे दलित साहित्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर जाता आहे. लक्ष्मण गायकवाडांना साहित्य आकदमीचा पुरस्कार मिळाला. बाबुराव बागुलांना महाराष्ट्र फाऊंडेशनचा जीवन गौरव पुरस्कार मिळाला. डॉ. गंगाधर पानतावणे हे तर अमेरिकेत भरलेल्या पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. याचे श्रेय डॉ. आंबेडकरांकडेच जाते. सद्यः स्थितीत अनेक दलित लोककलावंत अत्यंत प्रभावीपणे आपल्या कलेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांच्या विचार कार्याचा प्रचार प्रसार करीत आहेत. आपल्या गीतातून रूढी, परंपरा, कर्मकांड, देवधर्म नाकारून समतेचा पुरस्कार करीत आहेत. लोककलावंताकडून घडणारे हे कार्य समाज परिवर्त नाचा लढा गतिमान करण्यासाठी उपयुक्त ठरत आहे.

**सारांश ः**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनकार्य आणि क्रांतिकारक विचार तत्वज्ञानाच्या प्रमुख प्रेरणेतून दलित साहित्याची निर्मिती झाली. दलितांच्या जीवघेण्या व्यथा वेदनांबरोबरच या समाजात डॉ. आंबेडकरांच्या 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' या विचारांमुळे आलेल्या जागृतीचे, जीवन-जाणीवांचे चित्रण प्रखर रितीने प्रकटते. या साहित्य प्रवाहाच्या निर्मितीमुळे गाव कुसावाहेर जगणा-यांचे जीवन व्यक्त झाले. परिणामी

मराठी साहित्य अधिक समृध्द, संपन्न झाले . दलित साहित्य प्रवाहामुळेच देशातील विविध भाषिक लोकांच्यात अस्मिता निर्माण झाली . मराठी दलित साहित्याने भारतीय दलित साहित्याच्या आणि प्रत्येक भाषेतल्या दलित साहित्याच्या उदयासाठी ऊर्जा पुरविलेली आहे . मानवमुक्तीच्या वैचारिक लढ्याला दलित साहित्याने दिलेले बळ लक्षणिय आहे . केवळ मराठी साहित्यातच नव्हे तर भारतीय भाषेतील अन्य साहित्यात क्रांतिकारक बदल घडविण्याची उर्जा दलित साहित्याने दिली आहे हे नाकारता येत नाही .

**संदर्भ** ः

**1** . डॉ . शरणकुमार लिंबाळे, दलित साहित्याचे निकष बदलावे लागतील .
**2** . डॉ . प्रभाकर मांडे, दलित साहित्याचे निराळेपण .
**3** . डॉ . भालचंद्र फडके, डॉ . आंबेडकर आणि दलित साहित्य .
**4** . डॉ . अर्जुन डांगळे, दलित साहित्य एक अभ्यास .